POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२१ ● मुंबई, शुक्रवार, २२ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## हवामान खात्याचा अंदाज

# कमी दाबाचा पट्टा उत्तरेकडे पावसाचा जोर ओसरणार !



**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मागील चार दिवसांपासून राज्यभरात कोसळर्णाया मुसळधार पावसाचा जोर आज काहीसा ओसरला होता. त्याचप्रमाणे पुढील काही दिवस बहुतांश ठिकाणी पाऊस विश्रांती घेणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

प्रादेशिक हवामान केंद्राच्या अंदाजानुसार, मध्य महाराष्ट्र मराठवाडा तसेच कोकण भागात कमाल तापमानात पुढील २४ तास कोणताही बदल राहणार नाही. मात्र त्यानंतर दोन ते चार अंशांनी तापमान वाढेल. बंगालच्या उपसागरात असणारा कमी दाबाचा पट्टा आता उत्तरेकडे सरकत आहे. तसेच अरबी समुद्रावर असणारे चक्राकार वारेही गुजरातच्या दिशेने वाहत असल्याने पुढील काही दिवस राज्यात पावसाचा जोर कमी होणार आहे. आजपासून पुढील ३ दिवस तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

२३ ऑगस्टपर्यंत मुंबई , कोकण,मध्य महाराष्ट्र भागात वाऱ्याचा वेग ४० ते ५० किलोमीटर प्रति तास राहणार असून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. २५ ऑगस्टनंतर कोकण आणि मध्य महाराष्ट्र सह गुजरातमध्ये पावसाचा जोर पुन्हा वाढू शकतो . पुढील पाच दिवस राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाचा जोर कमी होणार आहे.

मात्र, कोकणात पुढील चार दिवस पावसाची शक्यता आहे. पुणे, सातारा, घाटमाथ्यावरही हाय अलर्ट देण्यात आले असून दोन दिवसांनी विदर्भात पावसाचा जोर वाढवण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## मुंबईकर झाले चिंतामुक्त, जलाशयांमध्ये पाण्याचा मुबलक साठा



मुंबईकरांची यंदाची पाण्याची चिंता दूर झाली आहे. कारण मागील तीन - चार दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांच्या पाणी पातळीत समाधानकारक अशी वाढ झाली आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमधून एकूण ९५.१२ टक्के पाणीसाठा झाला आहे. यामुळे कपातीविना किमान ३५८ दिवसांपर्यंत मुंबईकरांना पाणीपुरवठा करणे शक्य आहे. भातसाची क्षमता ७,१७,०३७ दशलक्ष लिटर असून या जलाशयात ६,६८,२०१ दशलक्ष लिटर एवढा पाणीसाठा आहे. अप्पर वैतरणाची क्षमता २,२७,०४७ दशलक्ष लिटर असून या जलाशयात २,०७,७६० दशलक्ष लिटर एवढा पाणीसाठा आहे. मध्य वैतरणाची क्षमता १,९३,५३० दशलक्ष लिटर असून या जलाशयात १,९०,९९३ दशलक्ष लिटर एवढा पाणीसाठा आहे. मोडकसागरची क्षमता १,२८,९२५ दशलक्ष लिटर एवढी असून या जलाशयात १,२८,९२५ दशलक्ष लिटर एवढा पाणीसाठा आहे. तानसाची क्षमता १,४५,०८० दशलक्ष लिटर असून या जलाशयात १,४५,०८० दशलक्ष लिटर एवढा पाणीसाठा आहे. तुळशीची क्षमता ८०४६ दशलक्ष लिटर एवढी असून या जलाशयात ८०४६ दशलक्ष लिटर एवढा पाणीसाठा आहे. विहारची क्षमता २७,६९८ दशलक्ष लिटर असून या जलाशयात २७,६९८ दशलक्ष लिटर एवढा पाणीसाठा आहे. मुंबईकरांना महापालिकेकडून दररोज ३८०० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केला जातो. या नियोजनाचा विचार करता सध्या जलाशयांमध्ये समाधानकारक पाणीसाठा आहे. पुढील काही दिवसांत होणाऱ्या पावसामुळे या साठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे मुंबईकर पाण्याच्या बाबतीत वर्षभरासाठी चिंतामुक्त झाले आहेत.

## मुंबईला नवा अलर्ट, पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा धुमाकूळ, नद्यांना पूर; आज कुठे काय परिस्थिती?



गेल्या चार दिवसांत पावसाने मुंबईत एकच धुमाकूळ घातला. गेले चार दिवस मुंबईसह उपनगरात जोरदार पाऊस बरसला, ज्यामुळे मुंबईकरांचे खूप हाल झाले. रस्त्यांवर पाणी साचलं, रेल्वे रुळ पाण्याखाली गेल्याने लोकल बंद पडल्या, घरात पाणी शिरलं, नद्या-नाल्यांना पूर आला, घरातून बाहेर पडणंही कठीण होऊन बसलं. या भीषण परिस्थितीनंतर गुरुवारी (21 ऑगस्ट) मुंबईने चार दिवसांनी मोकळं आकाश पाहिलं.

**मुंबईला पावसाचा येलो अलर्ट, काही भागात अधूनमधून पावसाची शक्यता**

पुढील 48 तासांसाठी मुंबई शहर आणि उपनगरातील काही भागात ढगाळ वातावरणाची शक्यता वर्तवण्यात आली आहे, काही निवडक भागात अधूनमधून मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. यादरम्यान कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे 28°C आणि 24°C च्या आसपास राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने आज Mumbai Rain Yellow Alert दिला आहे. मुंबई आणि आसपासच्या परिसरातील पावसाचा जोर ओसरला आहे. पण, आता हा पाऊस पश्चिम महाराष्ट्राकडे वळला आहे. पश्चिम महाराष्ट्रात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे नदीकाढच्या परिसरात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**कोल्हापूर पंचगंगा नदी धोका पातळीवर**

आज कोल्हापूरमध्ये पावसाने उघडीप दिली असली तरी, संततधार झालेल्या पावसामुळे पंचगंगा नदी धोक्याच्या पातळीवर वाहत आहे. तर, 79 बंधारेही पाण्याखाली आहे. रस्त्यावर पाणी आल्याने कोल्हापूर-पन्हाळा आणि कोल्हापूर शिये मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.दुसरीकडे, राधानगरीचे सात पैकी दोन स्वयंचलित दरवाजे सुरु आहेत. त्यामुळे राधानगरी धरणातून होणारा पाण्याचा विसर्गही कमी झाला आहे. दूधगंगा धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्येही पावसाचा जोर ओसरला असून धरणामध्ये येणाऱ्या पाण्याची आवक कमी झाली आहे. त्यामुळे दूधगंगा धरणाच्या सांडव्यावरून असणाऱ्या विसर्गामध्ये घट झाली आहे. परिणामी नद्यांच्या पाणीपातळीत थोडी घट होऊ शकते. तर कोल्हापूरसाठी ग्रीन अलर्ट देण्यात आल्यामुळे पावसाची उघडी बघायला मिळत आहे. त्यामुळे नागरिकांना थोडासा दिलासा मिळाला आहे.

**पंढरपुरात चंद्रभागा नदीला चौथ्यांदा पूर परिस्थिती**

उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रामधील सततच्या पावसामुळे उजनी धरणाच्या पाणी पातळीमध्ये सातत्याने वाढ होत असून आज उजनी धरणाच्या सांडव्यावरून पूर नियंत्रणासाठी एक लाख 72 हजार क्यूसेक्स विसर्ग भीमा नदीमध्ये सोडण्यात येत आहे. तसेच, वीर धरण पाणलोट क्षेत्रात पर्जन्यमान वाढल्याने आज वीर धरणातून नीरा नदीपात्रात 54760 क्यूसेक्स इतका विसर्ग सुरु आहे. उजनी धरणातील आणि वीर धरणातील असा एकत्रित 1 लाख 72 हजार क्यूसेक्स विसर्ग भीमा नदीमध्ये येण्याची शक्यता आहे. घाटमाथ्यावरील पावसाच्या प्रमाणानुसार व धरणामध्ये येणाऱ्या पाण्याच्या आवक नुसार विसर्गामध्ये अजून वाढ होण्याची शक्यता आहे. नदीपात्रालगत पूरस्थिती निर्माण होवून सखल भागातील नागरी वस्तीमध्ये पुराचे पाणी शिरण्यास सुरुवात झाली आहे. शंभर कुटुंबांना स्थलांतरित करण्यात आलं आहे. तरी, सुरक्षिततेच्या दृष्टीने नीरा व भीमा नदी काठच्या नागरिकांना आपले स्तरावरून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे

**रत्नागिरीत पावसाचा जोर ओसरला**

गेल्या आठवड्यावर धुळवड घातलेल्या पावसाने कोकणातही बुधवारपासून आता विश्रांती घेतली आहे जवळपास आठ ते दहा दिवसानंतर कोकणात गुरुवारी सूर्यदर्शन झालं आहे. हवामान विभागाकडूनही पावसाचा जोर ओसरला असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जोपास आठवडाभर सुरू असलेल्या जोरदार पावसाने रत्नागिरी, सिंधुदुर्ग,रायगड जिल्ह्यात मोठे नुकसान केल आहे. खेड येथील जगबुडी नदी जवळपास तीन ते चार दिवस धोक्याच्या पातळीवरून वाहत होती तर यंदा 2021 नंतर प्रथमच चिपळूण शहरात वाशिष्ठी नदीने इशारा पातळी ओलांडून शहरात प्रवेश केल्याने पाणी भरलं होत.

# महागात पडणार ३० दिवसांची तुरुंगवारी; मुख्यमंत्री, पंतप्रधान, मंत्र्यांची जाणार खुर्ची

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी मांडलेल्या विधेयकाला विरोधकांचा विरोध




**लोकसभेत गदारोळ**

**यावेळी काँग्रेससह विरोधी पक्षांनी या विधेयकांवर तीव्र आक्षेप घेत हे विधेयक लोकशाही विरोधी असल्याचे म्हटले. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजीही करण्यात आली. या विधेयकाच्या माध्यमातून राज्य सरकारे कमकुवत करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. गेस्टापो (सरकारचे गुप्त पोलीस) आणले जाऊ शकतात, असा आरोपही विरोधकांनी केला. हा गोंधळ सुरू असतानाचा काही खासदारांनी अमित शहा यांच्यावर कागद भिरकावले.**



- संसदेत जोरदार राडा
- विरोधकांकडून विधेयकांच्या प्रतींची चिरफाड
- सभापतींकडून कामकाज स्थगित

**■नवी दिल्ली । प्रतिनिधी,**

गंभीर गुन्हेगारी प्रकरणात अटक झाल्यास पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री किंवा मंत्री यांना पदावरून काढून टाकण्यासाठी केंद्र सरकार कायदा करणार आहे. यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संविधान (१३० वी दुरुस्ती) विधेयक, जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना (दुरुस्ती) विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश सरकार (दुरुस्ती) विधेयके मांडली. तिन्ही विधेयकांविरुद्ध लोकसभेत प्रचंड गोंधळ झाला. खासदारांनी तिन्ही विधेयकांच्या प्रती फाडत थेट अमित शहांच्या अंगावर फेकल्या. लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी संसदेचे काम स्थगित केले. विरोधकांनी तिन्ही विधेयके मागे घेण्याची मागणी केली. काँग्रेस आणि एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनीही विरोध केला. समाजवादी पक्षाने विधेयकांना न्यायविरोधी, संविधानविरोधी म्हटले. यावर शहा यांनी ही तीन विधेयके सादर केल्यानंतर ती विचारार्थ संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठविण्याचाही उल्लेख केला.

विधेयकांमध्ये जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा मंत्री यांना अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये अटक झाली, ज्यामुळे किमान ५ वर्षांची शिक्षा होऊ शकते आणि त्यांना सलग ३० दिवस कोठडीत ठेवले गेले, तर त्यांना ३१ व्या दिवशी पदावरून काढून टाकले जाईल. विशेष म्हणजे, अटकेतून सुटका झाल्यानंतर राष्ट्रपती किंवा राज्यपाल अशा पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा मंत्र्याची त्याच पदावर पुन्हा नियुक्ती करू शकतात, असेही विधेयकांत स्पष्ट करण्यात आले आहे.

सध्याच्या लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ नुसार, कोणत्याही खासदार किंवा आमदाराला दोन वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा झाल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होते. भ्रष्टाचार किंवा अंमली पदार्थांच्या तस्करीसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये तर शिक्षेचा कालावधी कितीही असला तरी अपात्रता निश्चित आहे. आतापर्यंत केवळ अटकेनंतर मंत्र्यांना पदावर राहण्यास कोणताही कायदेशीर अडथळा नव्हता. 'जोपर्यंत दोषी सिद्ध होत नाही, तोपर्यंत शिक्षा नाही', या तत्त्वावर हे सुरू होते. काही वर्षांपूर्वीपर्यंत अटकेच्या शक्यतेनेच मुख्यमंत्री आणि मंत्री राजीनामा देत असत; परंतु अलीकडच्या काळात ही प्रथा मोडली जात होती आणि अनेक मंत्री अटकेनंतरही पदावर कायम

### विधेयकांमधील प्रमुख तरतुदी कोणत्या ?

**मुख्यमंत्र्यांसाठी तरतूद :**

एखाद्या मुख्यमंत्र्याला किंवा मंत्र्याला किमान पाच वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेच्या गुन्ह्या प्रकरणी ३० सलग दिवस तुरुंगवास झाल्यास, ३१व्या दिवशी पंतप्रधानांच्या सल्ल्याने राष्ट्रपती त्यांना पदमुक्त करतील. जर सल्ला दिला गेला नाही, तर मंत्री आपोआप पदमुक्त होईल.

**पंतप्रधानांसाठी तरतूद :**

पंतप्रधानांना ३० सलग दिवस तुरुंगवास झाल्यास त्यांना ३१व्या दिवशी राजीनामा द्यावा लागेल. राजीनामा न दिल्यास ३२व्या दिवशी त्यांचे पद आपोआप रद्द होईल.

## बोईसर टकळ्ळ मध्ये वायू गळती, ४ कामगारांचा मृत्यू, तर अनेकांची प्रकृती चिंताजनक



**■पालघर। प्रतिनिधी,**

बोईसर तारापूर एमआयडीसीतील कारखान्यात वायुगळती झाल्याची घटना घडली आहे. या वायू गळतीमुळे ८ कामगारांना बाधा झाली असून, त्यामधील ४ कामगारांचा मृत्यू झाला आहे, तर इतर कामगारांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बोईसर तारापूर एमआयडीसीतील प्लॉट नंबर एफ १३ मधील मेडली फार्मासिटिकल्स लिमिटेड कंपनी दुपारच्या सुमारास वायुगळतीची दुर्घटना घडली. ज्यात सदर ठिकाणी काम करत असलेल्या ८ जणांना बाधा झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली. कामगारांची प्रकृती बिघडल्यानंतर त्या सर्वांना तातडीने नजीकच्या शिंदे या खाजगी रुग्णालयात तात्काळ दाखल करण्यात आले. मात्र त्यांपैकी ४ कामगारांचा मृत्यू झाला. तसेच उर्वरित कामगारांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यापूर्वीही बोईसर तारापूर एमआयडीसीत वायुगळतीची घटना घडलेली आहे. काही महिन्यांपूर्वी कॅम्लीन फाईन सायन्सेस लिमिटेड कंपनीत वायू गळती झाल्याने ११ कामगारांना त्याची बाधा झाली. कंपनीत डायमिथाईल सल्फेटची गळती झाल्याने कामगारांना डोळे चुरचुरणे आणि जळजळ होणे यांसारख्या समस्या जाणवल्या होत्या. त्यावेळी बाधित कामगारांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र आज घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असून, यात जीवितहानी झाल्याकारणामुळे, बोईसर तारापूर एमआयडीसीतील कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## मिठी नदीच्या घोटाळ्यातील तिसरा आरोपी अटकेत!



**■मुंबई । प्रतिनिधी,**

६५ कोटी रुपयांच्या मिठी नदी गाळ काढण्याच्या घोटाळ्याच्या चालू तपासात एक मोठी प्रगती झाली आहे. मुंबई पोलिसांच्या 'आर्थिक गुन्हे शाखेने' आज सकाळी बोरीवली येथील कंत्राटदार शेरसिंग राठोडला अटक केली. त्याला नंतर 'एस्प्लेनेड' न्यायालयात हजर करण्यात आले, जिथे त्याला पोलीस कोठडी सुनावण्यात आली. मिठी नदीतील गाळ काढण्याच्या घोटाळ्यातील ही तिसरी अटक आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राठोड हा नदीतील गाळ काढण्याच्या कामात वाढीव बिले आणि इतर अनियमिततांमध्ये गुंतलेला होता, असा त्याच्यावर आरोप आहे. या घोटाळ्यात अनेक कंत्राटदार आणि नागरी अधिकारी सहभागी असल्याचा आरोप असून, 'ई.ओ.डब्ल्यू.'कडून 'आर्थिक व्यवहारांच्या' तपासणीसाठी सक्रिय तपास सुरू आहे आणि गैरवापर केलेल्या निधीच्या लाभार्थ्यांची ओळख पटवली जात आहे. सूत्रांनी सांगितले की, येत्या काही दिवसांत आणखी अटक होण्याची शक्यता आहे. 'अंमलबजावणी संचालनालय' देखील नदीच्या साफसफाई प्रकल्पाशी संबंधित कथित आर्थिक अनियमितता आणि भ्रष्टाचाराचा समांतर तपास करत आहे. याआधी 'ईडी'ने बॉलिवूड अभिनेता डिनो मोरियाच्या घरी छापा टाकला होता आणि 'वोडार इंडिया लिमिटेड'च्या अटकेत असलेल्या आरोपी केतन कदमसोबतच्या त्याच्या आणि त्याचा भाऊ सँटिनो मोरिया यांच्या 'आर्थिक व्यवहारा'ची तपासणी केली होती.'व्हिर्गो स्पेशालिटीज प्रा. लि.'चा एक आरोपी जय जोशी याला स्थानिक न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला होता.

## मुसळधार पावसामुळे कारखान्यातील गणेशमूर्तींचे मोठ्याप्रमाणात नुकसान



**■मुंबई । प्रतिनिधी,**

ठाण्यात सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं असताना पावसाचा फटका गणपती मूर्तीर्ला देखील बसला आहे. अवघ्या आठ दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपला आहे. त्यामुळे मूर्तीकारांची गणेश मूर्ती घडविण्याची लगबग सुरु आहे. त्यातच, ठाणे शहरात मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसाचे पाणी माजिवडा भागात असलेल्या एका गणपतीच्या कारखान्यात शिरले. यामुळे कारखान्यातील गणेशमूर्तींचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असून यामध्ये शाडू माती आणि पीओपी मूर्तींचा समावेश होता.यातील सर्वाधिक मूर्ती बुकिंगच्या होत्या आणि त्या मूर्तींचे ९० टक्के काम पूर्ण झाले होते. यामुळे गणेश मूर्तीकार अनिकेत सोंडकर हे हतबल झाले असून आता ग्राहकांना काय उत्तर द्यायचे असा प्रश्न त्यांच्या समोर निर्माण झाला आहे. ठाणे शहरात गेले दोन दिवसांपासून पाऊस पडत आहे. मंगळवारी पहाटे पासून मुसळधार पावसाने ठाणे शहरात हजेरी लावली. या पावसामुळे अनेक सखल भागात पाणी साचले होते. तसेच काही रस्त्यांनाही नदीचे स्वरुप प्राप्त झाले होते. यामुळे वाहतूकीस अडथळा निर्माण झाला. तर, अनेक घरांमध्येही पावसाचे पाणी शिरले होते. या दरम्यान, माजिवडा भागातील एका गणपती कारखान्यात देखील पाणी शिरले. या पाण्यामुळे कारखान्यातील गणेशमूर्तींचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले. येत्या आठ दिवसांवर गणेशोत्सव आला आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# संकटकाळातील दिखावूगिरी



मुंबईसह राज्यभरात चार-पाच दिवस मुसळधार पाऊस कोसळला. राज्यात धुवाँधार पावसाने प्रचंड वाताहत केली. 14 लाख एकरवरील पिके आडवी झाली आहेत तर शेकडो गावे पूरग्रस्त झाली आहेत. अनेकांची घरे जमीनदोस्त झालीत, काहींचा पावसामुळे मृत्यू झाला, काही विजेच्या शॉकने मृत्युमुखी पडले. मुंबईकरांचे हाल तर नेहमीसारखेच होते. नेमोचि येतो पावसाळा या उक्तीप्रमाणे सगळीकडे पाणी भरले होते. लोकल ट्रेन ठप्प झाल्या होत्या. मोनोरेलमधील रेस्क्यू सर्वांनी पाहिला. या सर्वांमध्ये प्रकर्षाने जाणवलेली बाब म्हणजे लोकप्रतिनिधींची उपस्थिती. नेहमीप्रमाणे लोकप्रतिनिधी आले, त्यांनी पाहणी केली, त्यांनी कन्ट्रोल रुममधून आढावा घेतला. त्याचे काही फोटो आणि व्हिडीओ त्यांनी व्हायरल केले आणि मोठे काम केल्याच्या अविभार्वात पुढच्या वर्षी पुन्हा पाहणी करायला येईन, असे संकेत देऊन गेले. हे सांगण्याचे मोठे कारण आहे. गेल्या वर्षी पुण्यातील सिंहगड रोडवरील एकता नगरमध्ये खूप पाणी भरले होते. त्यावेळी मंत्री, राजकीय नेत्यांनी परिसराची पाहणी केली होती, रहिवाशांना काही आश्वासने दिली होती. ती आश्वासने त्याच पुराच्या पाण्यात वाहून गेली. यंदाही परिस्थिती तशीच आहे आणि येथील मंडळी आता सरकारच्या नावे खडे फोडत आहेत. गेल्या वर्षी विधानसभा निवडणूक होती म्हणून सर्व आले होते. यंदा कुणीच वाली नाही, अशी तक्रार त्यांनी केली. मुंबईकरांसाठी धोधो पाऊस, प्रमाणापेक्षा जास्त पाऊस किंवा भरतीच्या कालावधीत कोसळलेल्या पावसामुळे वाताहत होते. यंदा 26 मे रोजी मुंबईची अवस्था कशी झाली होती, हे सर्वांनी पाहिली. अशी वेळ येऊ नये म्हणून कोणत्या उपाययोजना केल्या, हे महत्त्वाचे आहे. त्याऐवजी आम्ही आपल्यासोबत आहोत, एवढे दाखवण्याचे काम मंत्री आणि राजकीय नेते करताना अनेकदा दिसतात. मग एक्स करून आम्ही तुमच्यासोबत असल्याचे दाखवले जाते. दरवर्षी किंवा जेव्हा जेव्हा पाऊस मुंबईत धुडगूस घालतो तेव्हा तातडीने मंत्री, नेते मुंबई महापालिकेच्या कन्ट्रोल रूममध्ये जाऊन आढावा घेतात. म्हणजे नक्की काय करतात, हे आजपर्यंत सर्वसामान्यांना कळले नाही. त्यानंतर ते लगेच अधिकार्यांना निर्देश देतात, म्हणजे नक्की काय करतात हेही सामान्यांना कळले नाही. वास्तविक ते काम संबंधित अधिकार्यांची जबाबदारी असते, मग त्यांना निर्देश दिले म्हणजे काय केले तर अधिकारी मंडळी जी कामे करतात तीच त्यांना पुन्हा करायला सांगितले जाते. त्यानंतर जागेवर जाऊन पूरस्थितीचा आढावा घेतला जातो. हे सगळं वारंवार किंवा दरवर्षी करावे लागत असेल तर ते यंत्रणेचे सपशेल अपयश आहे, याची जाणीव या मंत्र्यांना, नेत्यांना का होत नाही? जी मिठी नदी मुंबईच्या पुराला कारणीभूत ठरते ती मिठी नदी खोल झाली का? मिठी नदी परिसरातील अतिक्रमणे हटवली का? याची उत्तरे अजूनही मिळत नाहीत. 26 जुलै 2005 रोजी मुंबईत महाप्रलय आला होता. त्यानंतर मिठी नदीकडे सर्वांचे लक्ष गेले होते. आजही ती नदी तशीच असेल तर 20 वर्षांत आपल्या सरकारने काय केले, असा प्रश्न मुंबईकरांनी विचारल्यास त्यात चूक काय? मुळात पूर आणि भयानक स्थिती असताना त्या ठिकाणी अत्यावश्यक यंत्रणा काम करत असतात. पोलीस, अग्निशमन दलाचे जवान, एनडीआरएफचे जवान अशा प्रसंगात काम करत असतात. अशावेळी मंत्रीमहोदयांनी दौरे करणे म्हणजे त्यांचाच लवाजमा जास्त असतो. मग ही मंडळी अत्यावश्यक सेवेतील लोकांना काम कसे करायचे ते शिकवतात म्हणजे निर्देश देतात. हे वषार्नुवर्षे सुरू आहे. मात्र, मुंबईतील परिस्थिती जशी होती तशीच आहे. लोक संकटात असताना त्यांना मदत हवी असते, ती मदत लोकांपर्यंत पोहोचते की नाही याची खातरजमा लोकप्रतिनिधींनी करायची असते. एक्सवरून संकटात तुमच्यासोबत आहे, हे दाखवणे म्हणजे आपल्या अस्तित्वासाठी अगाचच टिवटिव करण्यासारखे आहे.

यंदा 26 मे रोजीच्या पावसात मुंबईतील भुयारी मेट्रोने रंग दाखवले. तर 19 ऑगस्ट रोजी मुंबईतील लोकल सेवा ठप्प झालेली असताना मोनोरेलचा आधार घेणार्या प्रवासी कोणत्या संकटात सापडले होते, हे सर्वांनी पाहिले. आता सरकारने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसानभरपाईसाठी तातडीने पाऊले उचलायला हवीत. मात्र होते असे की, गावोगावी मंत्री, आमदार त्यांच्या भागात दौरे करतात. त्यांच्यासोबत महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी असतात आणि हे लोकप्रतिनिधी संबंधित अधिकारी, कर्मचार्यांना तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश देतात. त्याऐवजी महसूलच्या कर्मचार्यांना पंचनामे करण्यासाठी वेळ दिल्यास ते त्यांचे काम अधिक वेगाने करतील आणि शेतकर्यांना कदाचित लवकर नुकसानभरपाई मिळू शकेल. मात्र, मी लोकांची कामे केली आहेत, हे दाखवण्याचा आपल्याकडे अट्टाहास जास्त असतो. मग पाहणी दौरे होतात. लोकप्रतिनिधींनी जनतेशी संवाद साधावा, पण जनता संकटकाळात असते तेव्हा त्यांना मदतीची गरज असते. ती मदत मिळवून देताना माज्यामुळेच हा हट्ट नको. म्हणूनच संकटकाळातील दिखावूगिरी थांबायला हवी आणि संकट येऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करायला हवी! मुसळधार पावसाने मुंबईपासून ते विदर्भापर्यंत जवळपास संपूर्ण महाराष्ट्राची केविलवाणी स्थिती करून टाकली आहे, त्याला निसर्गाच्या अवकृपेइतकीच प्रशासन यंत्रणांची निष्क्रियताही कारणीभूत आहे. अतिवृष्टीने मुंबईचे जनजीवन विस्कळित केले, तर मराठवाड्यात नांदेडमध्ये मुखेड तालुक्यात आजवर कधीच झाला नव्हता, इतक्या पावसाने नागरिकांची घरेदारे उद्धवस्त करून टाकली. राज्यभरात गेल्या पाच दिवसांत २९ बळी गेले, त्यापैकी ११ मराठवाड्यातील आहेत. राज्यातील अनेक शहरांमध्ये या पावसात रस्त्यांनी ओढ्यानाल्यांचे रूप धारण केले आणि राज्यात ठिकठिकाणी नद्यांनी काठांवरून नागरी वस्त्यांमध्ये धाव घेतली. राज्यातील बारा लाख हेक्टर शेती बाधित झाली असून आता ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होऊ लागली आहे. केवळ सहा तासांत दोनशे मिलिमीटर, तर २४ तासांत साडेतीनशे मिलिमीटर अशा पावसाने मुंबईकरांना २६ जुलै २००५ ची आठवण करून दिली. पावसाच्या या तडाख्यातून कोणीही सुटले नाही. रुळांवर पाणी साचल्याने रेल्वे रद्द झाल्या, रस्त्यांवर साचलेल्या कमरेइतक्या पाण्यात बस-रिक्षासह वाहने अडकली, मोनोरेल खांबावरच बंद पडून प्रवाशांचे प्राण कंठाशी आले, तर धावपट्टीवर पाणी साचल्याने विमानांनाही हवेतच चकरा माराव्या लागल्या. ही निसगार्ची अवकृपा खरीच; पण केवळ त्याकडे बोट दाखवून राज्यकर्ते आणि प्रशासनाला मोकळे होता येणार नाही. मुंबई स्पिरिटच्या गोंडस नावाखाली दर पावसाळ्यात अनन्वित हाल सहन करणाऱ्या मुंबईकरांची आणखी किती परीक्षा पाहणार, याचे उत्तर देण्याची वेळ आली आहे. रेल्वे स्थानकांवर गर्दीत गुदमरणाऱ्या चाकरमान्यांना आणि घरांत पाणी शिरल्याने उद्धवस्त झालेल्या संसाराकडे हताशपणे पाहणाऱ्या मुंबईकरांना रेड किंवा ऑरेंज एलर्टविना सरकार काहीही देऊ शकत नाही, ही स्थिती प्रगतिशील महाराष्ट्राला शोभणारी नाही. मिठी नदीतील गाळ काढणे किंवा नालेसफाईचे पितळ या एकाच पावसाने उघडे पाडले. समुद्राला आलेली भरती, हे नैसर्गिक कारण; पण अपुरी ड्रेनेजव्यवस्था आणि मुंबईसह अनेक शहरांमध्ये रस्त्यांवर- गल्लीबोळांमध्ये जागा मिळेल, तेथे काँक्रिट ओतून पाणी जमिनीत मुरण्यास अटकाव करण्याचा अट्टहासही शहरांच्या मुळावर येत आहे. प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे पाणी वाहून जाण्यास आपण अडथळा निर्माण करीत आहोत, हे नागरिकांनीही लक्षात घेतले पाहिजे. मराठवाड्यातही नांदेड, बीडसह आसपास पावसाने दणका दिला. आयुष्यात इतका पाऊस पाहिला नव्हता, असे मुखेड तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक सांगतात. तरीही काठावरील गावांचे पुनर्वसन करण्यापूर्वीच लेंडी प्रकल्पाची घळभरणी करण्याच्या घाईमुळे अडवलेले पाणी गावांत शिरून मोठ्या दुर्घटनेला सामोरे जावे लागल्याचा नागरिकांचा आरोप आहे. त्याचीही चौकशी झाली पाहिजे. या पावसाने राज्यातील बारा ते चौदा लाख हेक्टरवरील उभ्या पिकांना फटका बसल्याची प्राथमिक माहिती आहे, तर कोकणातील अनेक गावे दरड कोसळण्याच्या भीतीच्या छायेखाली जगत आहेत. पावसाचा अंदाज देणारी यंत्रणा अधिक अद्ययावत आणि अचूक असणे किती गरजेचे आहे, याची जाणीव या निमित्ताने होते; त्याबरोबरच निसर्गावर किती अतिक्रमण करायचे, याचीही मयार्दा आखून घेतली पाहिजे. राज्यातील अनेक शहरांत थेट नदी-ओढ्यांची पात्रे अडवून-वळवून अतिक्रमण झाले आहे, ठिकठिकाणी डोंगर फोडून केलेली विकासकामे दरडींना निमंत्रण देत आहेत. पश्चिम घाट वाचविण्यासाठी तज्ज्ञ देत असलेल्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करून होणारा हा तथाकथित विकास नागरिकांचा काळ ठरू नये. तसेच या संकटकाळातही राजकारण करण्याची खोड अनेकांना जडली असून तुमच्या काळात किती पाणी साठले आणि आमच्या काळात काय झाले, या आरोप-प्रत्यारोपांना आवर घातला पाहिजे. लष्कर, एनडीआरएफ, सरकार आणि स्थानिक प्रशासन सध्या बचावकार्यात गुंतले आहे. बाधितांची घरेदारे पुन्हा उभी करणे, नुकसानाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देणे, ही काळाची गरज आहे. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी विरोधकांनी केली आहे; त्याबाबतही साधकबाधक विचार करून सरकारने तिजोरी खुली करावी. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडातील भयकारी घटनांनंतर काही दिवसांतच महाराष्ट्रात आलेल्या या पूरस्थितीने हे संकट आपलेही दार ठोठावत आहे, याचे भान ठेवले पाहिजे.

# ब्रँडचा वाजला बँड



राज्यातील बँकांपासून अनेक सहकारी संस्थांच्या निवडणुका होतात. त्यात पॅनल उभे करून संचालक मंडळावर पूर्ण वर्चस्व राहण्यासाठी अटीतटीची चुरस झालेली आपण पाहतो. पण, त्याला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न कोणी करत नाही. ठाकरे ब्रँडचा गवगवा करून राजकीय क्षेत्रात मोठे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला; महाराष्ट्रातील एका राजकीय घराण्याचा वारसा सांगणाऱ्या कुटुंबाची अशी अवस्था होईल याची महाराष्ट्रातील जनतेला अपेक्षा नव्हती. निमित्त ठरले मुंबईतील बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीचे. १९ वर्षांनंतर ठाकरे बंधू पहिल्यांदाच या निवडणुकीच्या निमित्ताने एकत्र आले. राज आणि उद्धव ठाकरे या दोन पक्षांनी युती करून यंदाची बेस्ट पतपेढीची निवडणूक लढविल्याने माध्यमाच्यादृष्टीने तो चचेर्चा विषय ठरला होता. बेस्टच्या सेवेत बहुसंख्य मराठी कर्मचारी असल्याने, ठाकरे बंधूंच्या एकीमुळे, आम्हीच निवडून येणार असल्याचा दावा त्यांच्याकडून केला होता. मात्र, संचालक पदाच्या निवडणुकीत २१ जागांपैकी एकही जागा ठाकरे बंधू जिंकू शकले नाहीत. तितका दारुण पराभव होईल, असे त्यांनाही स्वप्नात वाटले नसावे. त्यामुळे ब्रँडचा बँड वाजला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसाला कोणीही गृहीत धरू नये. मराठीचे कैवारी फक्त आम्ही असे बोलणारे आता कोणत्या बिळात लपले आहेत, अशी मंत्री नितेश राणे यांची प्रतिक्रिया बोलकी आहे. ठाकरे बंधू एकत्र आले तर महाराष्ट्रातील मराठी माणूस त्यांच्या पाठीशी उभा राहील, असे नेरेटीव्ह तयार करण्याचा प्रयत्न गेल्या तीन-चार महिन्यांपासून सुरू होता. हिंदी सक्तीच्या मुद्द्यांवरून दोघे एकत्र आल्याने मराठी माणूस हा ठाकरे कुटुंबांच्या पाठीशी आहे असे चित्र निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न माध्यमातून करण्यात आला. त्याला बेस्टमधील पतसंस्थेच्या निवडणुकीमुळे छेद बसला आहे. बेस्ट पतसंस्थेची ९ वर्षांनंतर ही निवडणूक झाली. गेले ९ वर्षं उबाठा सेनेच्या संचालकांची सत्ता होती. १५ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांनी मतदान करून या पतसंस्थेतून उबाठा सेना आणि मनसे युतीच्या एकाही संचालकाला निवडून दिले नाही. याचा अर्थ कर्मचाऱ्यांचा किती राग असेल. बेस्ट परिवहन संस्था ही डबघाईला जात असताना, कर्मचाऱ्यांच्या तक्रारी, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी उबाठा सेनेच्या युनियनकडून प्रयत्न झाले नाहीत. कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन करण्यास ते अपयशी ठरले, असे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या नोकरीच्या ठिकाणचे प्रश्न असतात. प्रशासनाच्या माध्यमातून त्या प्रश्नाचे निरसन करावे लागते, ही बाब युनियनच्या नेतेमंडळींना चांगलेच ठाऊक असते. मात्र, मुंबई महापालिकेत सत्तेचे लोणी खाणाऱ्या उबाठाला कर्मचाऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या समस्या कधी कानावर आल्या असल्या तरी, त्यांना योग्य न्याय द्यावा का, असे वाटले नसावे. याच ठाकरेंच्या काळात बेस्टमध्ये खासगीकरणाचा चंचुप्रवेश झाला आणि आज त्याच खासगीकरणामुळे बेस्टचा नावलौकिक रसातळाला गेला. कंत्राटदाराच्या भल्यासाठी बेस्टला दावणीला बांधले गेले. इतके की बेस्टमधून निवृत्त झालेल्या अडीच-तीन हजार कर्मचाऱ्यांना आज आपल्याच पैशांसाठी या उतारवयात आझाद मैदानात आंदोलन करावे लागत आहे, हे पाप कोणाचे? ठाकरे बंधूंच्या उत्कर्ष पॅनेलला भोपळाही फोडता आला नाही, यातून तोच अर्थ काढावा लागेल.

मुंबईत ३०-४० वर्षांपूर्वी बेस्टमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला चांगला पगार मिळत असल्याने मराठी कुटुंबामध्ये त्याला प्रतिष्ठा होती. आता बेस्ट ही संस्था डबघाईत गेल्याचे चित्र उभे राहिले आहे. 'आंधळं दळतंय आणि कुत्र पीठ खातय', अशी अवस्था बेस्टची झालेली आहे. याला सर्वस्वी जबाबदार गेली तीस वर्षे मुंबई महानगरपालिकेसह बेस्ट प्रशासनावर सत्ता उपभोगणाऱ्या उबाठा सेनाच आहे, याची जाणीव कर्मचाऱ्यांना झालेली आहे. बेस्ट कर्मचाऱ्यांच्या वसाहतीतील राहणाऱ्या कुटुंबाचे प्रश्न हा एक वेगळा विषय ठरू शकतो; परंतु त्याकडे हेतूपुरस्पर दुर्लक्ष केले गेले होते. हजारो बेस्ट कामगारांना मुंबईत स्वतःचे घर नसल्याने ते मुंबईबाहेर फेकले गेले आहेत. ते सर्व मराठीच असताना, त्यांच्या स्थलांतरणास कोण जबाबदार हे कामगारांना नव्याने सांगायला नको. एकेकाळी ४२ हजार असलेला कर्मचारीवर्ग आज २४ हजारांवर आला आहे. बेस्ट बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या ४५ लाखांहून ३० लाखांवर आली आहे. तरीसुद्धा आज बेस्ट बसवर सर्वसामान्य जनतेचा प्रचंड विश्वास आहे. बेस्टचे वाहनचालक आणि वाहक हा प्रवाशांमधील दुवा असतो. बेस्टमधील कर्मचाऱ्यांवरील विश्वासाचा एक किस्सा नेहमी ऐकविला जातो. 'मुंबईत राहणाऱ्या तरुण मुलीला तिची आई नेहमीच सांगायची, जर रात्री घरी यायला उशीर झाला तर बेस्ट बसमधून घराकडे ये. बेस्ट बसमधल्या प्रवासाइतके दुसरे सुरक्षित वाहन नाही', असा एका आईने मुलीला दिलेला सल्ला हा एक किस्सा असला तरी, बेस्टमधील प्रामाणिक कर्मचाऱ्यांवरील विश्वासाचे एक उदाहरण समोर येते. बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत जे मतदान झाले ते बॅलेटवर. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर उबाठासह विरोधी पक्षांच्या नेत्यांकडून ईव्हीएम मशीनवर जे प्रश्न चिन्ह निर्माण केले होते, त्यालाही ही निवडणूक हे उदाहरण होऊ शकते. जेव्हा विरोधी पक्षांतील मंडळी लोकसभा जिंकतात, तेव्हा ईव्हीएमचा दोष नसतो, पण पराभव झाला की ईव्हीएम आणि निवडणूक आयोग दोषी ठरतात. पतसंस्थेची निवडणूक ही महानगरपालिकेची रंगीत तालीम होती. त्यात, ब्रँडची हवा काढण्याचे काम या निवडणुकीत झाले. बेस्टच्या निवडणुकीच्या आनुषंगाने मराठी जनतेचे प्रतिनिधी करणाऱ्या बेस्ट कर्मचाऱ्यांनी पुन्हा एकदा ठाकरे बंधूंना नाकारले. घरी बसून फक्त आदेश देणाऱ्यांना जनता स्वीकारत नाही. ब्रँडचा बँड वाजवण्याचे काम जनता करते, हे या निकालातून दिसून येते.

# अडचणीचा ठरतोय अमेरिकन व्हिसा



सध्या अमेरिका व्हिसा देताना लॉटरी प्रणालीऐवजी वेतनआधारित निवड प्रक्रिया राबवत आहे. एच-१ बी व्हिसाचे सर्वाधिक लाभार्थी असल्याने या बदलांचा भारतीयांवर मोठा परिणाम होईल. आधी लॉटरी पद्धतीने व्हिसा मिळत असल्याने करिअरची निवड व्हिसा मिळण्याच्या शक्यतांवर आधारित होती. नवीन प्रणालीमुळे उच्च वेतन असलेल्या पदांना प्राधान्य मिळेल. यामुळे भारतीय तंत्रज्ञ आणि विद्यार्थ्यांना फटका बसू शकतो.

अमेरिका म्हणजे संधीचे महाद्वार हा समज भारतीय युवा पिढीत १९८० नंतर प्रचलित झाला. उच्च शिक्षण आणि नंतर नोकरी- व्यवसाय अशा पद्धतीने हजारोंच्या संख्येने भारतीय तिथे रहिवास करू लागले. काही लोक त्याला ब्रेन ड्रेन असेही म्हणतात. त्यासाठी लागणारे अत्यावश्यक घटक म्हणजे पासपोर्ट आणि व्हिसा. अमेरिकन एच-१ बी व्हिसा हा कुशल परदेशी कामगारांना (विशेषतः तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रातील) अमेरिकेत तात्पुरत्या स्वरूपात काम करण्याची परवानगी देणारा एक नॉन-इमिग्रंट व्हिसा आहे. एच-१ बी व्हिसाची मुळे १९५२च्या इमिग्रेशन आणि नॅशनॅलिटी ॲक्टमध्ये आहेत. सुरुवातीला याला एच-१ व्हिसा असे म्हटले जात असे आणि तो असामान्य स्वरूपाच्या सेवा प्रदान करू शकणाऱ्या परदेशी व्यक्तींसाठी होता.

१९८०च्या दशकात अनेक संगणक व्यावसायिक बी-१ (बिझनेस व्हिसा) वर काही कालावधीसाठी अमेरिकेत जाऊन काम करत. त्यांना तिथे अलाउन्स मिळे आणि त्यावर करही नसे. अनेक आयटी कंपन्यांनी याचा फायदा घेतला आणि हजारोंच्या संख्येने भारतीय संगणक तज्ज्ञ तिथे पाठवले (याला बॉडी शॉपिंग असेही म्हटले जायचे). स्थानिक संगणक व्यवसायिकांपेक्षा भारतीयांचा पगार आणि इतर खर्च कमी असल्याने याचे प्रमाण वाढत गेले. पण स्थानिकांचे रोजगार जात असल्याची भीती वाटल्याने अमेरिकन सरकारने त्यावर कारवाई केली आणि नवीन व्हिसा पद्धत आणली. १९९० मध्ये राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच. डब्ल्यू. बुश यांनी इमिग्रेशन ॲक्ट ऑफ १९९० वर स्वाक्षरी केली. ज्याने एच-१ व्हिसाचे विभाजन एच-१ ए (नर्सेससाठी, जो आता अस्तित्वात नाही) आणि एच-१बी (विशेष व्यवसायांसाठी) मध्ये केले. याच कायद्याने एच-१बी व्हिसासाठी वार्षिक ६५,००० इतकी मयार्दा (कॅप) निश्चित केली. तसेच, नियोक्त्यांना कर्मचाऱ्याला किमान प्रचलित मंजुरी देणे बंधनकारक केले.

१९९० च्या दशकात तंत्रज्ञान क्षेत्राच्या वाढीमुळे कुशल कामगारांची मागणी वाढली. यामुळे १९९९-२००० मध्ये एच-१ बी व्हिसाची मयार्दा १,१५,००० पर्यंत वाढवण्यात आली. २००० नंतर डॉट कॉम उद्योगाचा फुगा फुटल्याने तंत्रज्ञान क्षेत्रातील मागणी कमी झाली. त्यामुळे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांच्या दुसऱ्या कार्यकाळात (२००४-२००८) एच-१ बी व्हिसाची मयार्दा पुन्हा ६५,००० पर्यंत आणली गेली, पण अमेरिकेतून मास्टर्स डिग्री घेतलेल्यांसाठी अतिरिक्त २०,००० जणांच्या व्हिसाचा कोटा ठेवण्यात आला. २००७ मध्ये अमेरिकेत आर्थिक मंदी सुरू झाली. यामुळे बराक ओबामा प्रशासनाने २००९ मध्ये एम्प्लॉय अमेरिकन वर्कर्स कायदा संमत केला. यामुळे सरकारने निधी दिलेल्या कंपन्यांना एच-१ बी व्हिसावर विदेशी कामगार भरती करण्यावर निर्बंध आले. डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष असताना अमेरिका फर्स्ट धोरणामुळे एच-१ बी व्हिसावर अनेक निर्बंध आले. व्हिसा नाकारण्याचे प्रमाण वाढले. यामुळे उच्चशिक्षित लोकांना प्राधान्य दिले गेले. २०२० मध्ये कोविड महामारीच्या काळात तर एच-१ बी व्हिसा देण्यावर तात्पुरती बंदी घालण्यात आली होती. जो बायडन सत्तेवर आल्यानंतर एच-१ बी व्हिसावरील बंदी हटवण्यात आली. तसेच भारतीय पंतप्रधानांच्या अमेरिका दौऱ्यादरम्यान एच-१ बी व्हिसाच्या नूतनीकरणाची प्रक्रिया अमेरिकेतच करण्याची घोषणा करण्यात आली. यामुळे भारतीयांना मोठा दिलासा मिळाला. राष्ट्राध्यक्ष झाल्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक धोरणात्मक बदल केले. त्यात प्रामुख्याने आयात शुल्क तसेच स्थानिक अमेरिकन व्यक्तींना प्राधान्य देण्याच्या धोरणाचा समावेश होता. त्यामुळे ते स्थलांतराच्या विरोधी आहे. अमेरिकन व्हिसा प्रक्रियेत सध्या होणाऱ्या बदलांमुळे भारतीय नागरिकांवर मोठा परिणाम होत आहे. विशेषतः एच-१ बी तांत्रिक कामगार व्हिसा, जन्मजात नागरिकत्व, व्हिसा मुलाखतीच्या अटी आणि नूतनीकरणाच्या प्रक्रियेमध्ये झालेल्या बदलांमुळे अनेक प्रवासी, विद्यार्थी आणि उद्योजक गोंधळात सापडले आहेत. एच-१ बी व्हिसाची मागणी उपलब्ध व्हिसापेक्षा जास्त असल्याने दरवर्षी लॉटरी पद्धतीने अर्जदारांची निवड केली जाते.

नवीन प्रस्तावानुसार, एच-१ बी व्हिसा वाटप करताना ऑक्युपेशनल एम्प्लॉयमेंट स्टॅटिस्टीक्सच्या वेतन स्तरांना प्राधान्य दिले जाईल. याचा अर्थ, ज्या पदांसाठी अधिक वेतन दिले जाते (लेव्हल ४) त्यांना प्राधान्य मिळेल, त्यानंतर लेव्हल ३, लेव्हल २ आणि शेवटी लेव्हल १. एच-१ बी व्हिसाचे सर्वाधिक लाभार्थी असल्याने, या बदलांचा भारतीयांवर मोठा परिणाम होईल. सध्या लॉटरी पद्धतीने व्हिसा मिळत असल्याने करिअरची निवड व्हिसा मिळण्याच्या शक्यतांवर आधारित होती. नवीन प्रणालीमुळे उच्च वेतन असलेल्या पदांना प्राधान्य मिळेल. यामुळे भारतीय तंत्रज्ञांना आणि विद्यार्थ्यांना आपल्या करिअरच्या योजनांमध्ये बदल करावा लागू शकतो. व्हिसा अर्जात गेल्या ५ वर्षांमध्ये वापरलेल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सची माहिती देणे आता अनिवार्य झाले आहे. अर्ज मिळाल्यानंतरही दूतावास नियमित तपासणी करत आहे. सध्याच्या परिस्थितीत अमेरिकेत शिक्षणासाठी जाणे आणि शिक्षणानंतर तिथेच करिअर करणे, पूवीर्पेक्षा अधिक आव्हानात्मक झाले आहे, असे म्हणता येईल. २१४ (बी) कलमानुसार व्हिसा नाकारण्याचे प्रमाण काही प्रमाणात वाढले आहे. या कलमानुसार, तुम्ही तुमच्या मूळ देशाशी पुरेसे संबंध सिद्ध न करू शकल्यास व्हिसा नाकारला जाऊ शकतो. अनेकदा, चांगले प्रोफाइल असलेल्या विद्यार्थ्यांनाही या कारणास्तव नकार मिळाल्याचे दिसून आले. एच-१ बी व्हिसा हा अनेकदा ग्रीन कार्ड मिळवण्याच्या दिशेने पहिले पाऊल मानले जाते. एच-१बी व्हिसा मिळवणेच कठीण झाले, तर भारतीय विद्यार्थ्यांसाठी अमेरिकेत कायमस्वरूपी स्थायिक होण्याचा मार्ग अधिक लांबचा आणि अवघड होऊ शकतो. या आव्हानांमुळे अनेक भारतीय विद्यार्थी आता इतर देशांकडे वळताना दिसत आहेत. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जर्मनी आणि युनायटेड किंग्डमसारख्या देशांमध्ये शिक्षणानंतर नोकरीच्या अधिक सोप्या संधी उपलब्ध असल्याने भारतीय विद्यार्थ्यांसाठी आकर्षक पर्याय ठरत आहे. काहींनी जपान हा पर्याय निवडला आहे. दुसऱ्या बाजूने विचार करता भारतातही आता उच्चशिक्षणाचे उत्तम पर्याय उपलब्ध असून अनेक क्षेत्रांमध्ये जागतिक दर्जाचे शिक्षण दिले जाते. त्यामुळे शिक्षणासाठी परदेशीच जायला पाहिजे असे काही बंधन नाही. अनेक परदेशी विद्यापीठे आता आपल्या देशात त्यांची ऑफशोर केंद्रे उभारत आहे. नुकतेच नवी मुंबईमध्ये अशाच एका केंद्राचे उद्घाटन झाले. आज अनेक जागतिक उद्योग भारतात जीसीसी (ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स) निर्माण करत आहेत. फक्त महाराष्ट्रातच अशी ७०० हून अधिक केंद्रे विकसित झाली आहेत.



# पेरू तुम्हाला निरोगी ठेवतो

क्वचितच असा कोणी असेल ज्याला हे स्वादिष्ट फळ आवडत नाही. विशेषतः हिवाळ्याच्या हंगामात पेरू खूप फायदेशीर मानले जाते. या फळाचे सेवन केल्याने तुम्हाला अनेक फायदे मिळतात. त्यात कमी कॅलरीज आणि उच्च फायबर असते. वजन नियंत्रित करण्यासाठी हे खूप चांगले आहे. या फळाचे सेवन केल्याने साखर देखील नियंत्रणात राहते. पेरू हे पोषक तत्वांचे भांडार आहे, ज्यामध्ये व्हिटॅमिन सी, लायकोपीन आणि अँटीऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात. जे आरोग्याला अनेक रोगांपासून वाचवण्यास मदत करते. पेरूसोबतच त्याची पाने औषधी गुणधर्मांनीही परिपूर्ण आहेत. हिवाळ्यात पेरूचे सेवन खूप फायदेशीर आहे. ते शरीरातील रक्ताची कमतरता पूर्ण करते, तसेच हिवाळ्यात सर्दी आणि खोकल्यापासून आराम देते. पेरू हिवाळ्यात सर्दीपासून संरक्षण करते. अशा उपयुक्त पेरूचे काय फायदे आहेत ते जाणून घ्या.

पेरू रोगप्रतिकारक शक्ती सुधारतेः

बदलत्या हवामानात रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते, अशा हवामानात पेरू खाणे खूप फायदेशीर आहे. पेरू रोगप्रतिकारक शक्ती वाढवेल, तसेच तुम्हाला ऊर्जा देईल.

पचनक्रिया व्यवस्थित ठेवतेः

इतर फळांच्या तुलनेत पेरूमध्ये सर्वाधिक प्रमाणात फायबर असते, ज्यामुळे बद्धकोष्ठता दूर होते. पेरूच्या बिया गॅस आणि अपचनाची समस्या दूर करण्यास मदत करतात.

हृदयाच्या आरोग्याची काळजी घेतेः

पेरू हृदय निरोगी ठेवण्यासाठी खूप प्रभावी आहे. पेरूमध्ये अँटीऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि अनेक पोषक तत्वे असतात, जी हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात.

मधुमेह नियंत्रित करतेः

पेरूमध्ये असलेले फायबर कमी ग्लायसेमिक इंडेक्समुळे मधुमेह नियंत्रित करण्यास मदत करते. पेरूमध्ये नैसर्गिक साखर आढळते, जी मधुमेहाच्या रुग्णांसाठी देखील फायदेशीर ठरू शकते.

त्वचेची काळजी घेतेः

पेरू त्वचेसाठी फायदेशीर मानले जाते. पेरूमध्ये मुबलक प्रमाणात जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात जी त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करू शकतात.

# अंडी अशा प्रकारे उकळा

अंडी हे प्रथिनांचे समृद्ध स्रोत आहेतः

अंडी हा इतका अष्टपैलू घटक आहे की तुम्ही सँडविच आणि ऑम्लेट सारख्या पदार्थांपासून ते केकसारख्या मिष्टान्नांपर्यंत काहीही बनवू शकता. ते बनवायला सोपे आहेत आणि प्रथिनांचे समृद्ध स्रोत आहेत.

उकळण्याच्या पद्धतीः

उकळत्या अंड्यांचा विचार केला तर ते उकळण्याचे दोन मुख्य मार्ग आहेत - मऊ उकडलेले अंडी आणि कडक उकडलेले अंडी. मऊ उकडलेल्या अंड्यांमध्ये, बलक थोडे वाहते आणि पोत मलईदार असते. दुसरीकडे, कडक उकडलेल्या अंड्यांमध्ये, बलक घट्ट असतो.

चवीनुसार अंडी उकळण्याची वेळः

एका पॅनमध्ये थोडे थंड पाणी घ्या आणि त्यात अंडी घाला. एकाच वेळी खूप अंडी घालू नका हे लक्षात ठेवा. गॅस स्टोव्ह पेटवा आणि पाणी उकळू लागले की, पॅन आगीवरून काढा. जर तुम्हाला तुमच्या अंड्याचा पांढरा भाग थोडा मऊ, मऊ आणि बलक द्रव हवा असेल तर अंडी अगदी ३ मिनिटे उकळवा.

जर तुम्हाला अंड्यातील पिवळ बलक थोडे कमी द्रव आणि पांढरा भाग मऊ आणि थोडा घट्ट हवा असेल, तर अंडे ४ मिनिटे उकळवा.

जर तुम्हाला अंड्यातील पिवळ बलक मऊ आणि गुळगुळीत हवा असेल आणि अंड्याचा पांढरा भाग मऊ पण घट्ट हवा असेल, तर तुम्ही अंडे ६ मिनिटे उकळवावे.



# खूप फायदेशीर हिंग

मधुमेह, रक्तदाब, आम्लपित्त आणि सांधेदुखी या सामान्य समस्या जवळजवळ सर्वच लोकांमध्ये दिसून येतात. या सर्वांसाठी लोक किडनीला हानी पोहोचवणारी अनेक प्रकारची औषधे घेतात. अशा परिस्थितीत, या किरकोळ आजारांपासून मुक्त होण्यासाठी, कोमट पाण्यात चिमूटभर हिंग मिसळून प्यावे, ज्यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. चला जाणून घेऊया हिंगाचे चमत्कारिक फायदे.

चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे लोकांना आम्लपित्त येते. अशा परिस्थितीत, दररोज सकाळी रिकाम्या पोटी एक ग्लास पाण्यात हिंग मिसळून प्यावे. त्यात असलेले दाहक-विरोधी गुणधर्म पचनक्रिया सुधारतात.

जर तुम्ही हिंगाचे पाणी प्यायले तर शरीरातील रक्तातील साखरेची पातळी संतुलित राहते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका राहत नाही.

हिंगाचे पाणी ज्या लोकांना मूत्र संसर्ग किंवा त्याच्याशी संबंधित इतर कोणतीही समस्या आहे त्यांच्यासाठी देखील खूप फायदेशीर आहे.

हिंगातील दाहक-विरोधी गुणधर्म हाडे मजबूत करतात आणि सांधेदुखी कमी करतात.

हिंगाच्या पाण्यात आढळणारे बीटा कॅरोटीन डोळे निरोगी ठेवण्यास मदत करते. दररोज ते सेवन केल्याने दृष्टी देखील सुधारते.



# बडीशेप चहा पिण्याचे फायदे

बडीशेप खाल्ल्याने अनेक समस्यांमध्ये आराम मिळतो. तोंडाची दुर्गंधी कमी होणे, पोटाशी संबंधित समस्या कमी होणे, पचनशक्ती वाढण्यास मदत होणे, पोटातील जळजळ दूर होणे यासारख्या आजारांपासून मुक्तता मिळते. बडीशेपमध्ये असलेले फायबर लठ्ठपणा कमी करण्यास मदत करते. यासाठी बडीशेपचे पाणी प्यायले जाते.

आतापर्यंत तुम्ही बडीशेपच्या वेगवेगळ्या प्रकारच्या फायद्यांबद्दल ऐकले असेलच, पण बडीशेपचा चहा देखील बनवला जातो. हे थोडे विचित्र वाटेल. पण बडीशेपच्या चहाचे आश्चर्यकारक फायदे आहेत, चला त्याबद्दल जाणून घेऊया -

बडीशेप चहा बनवण्याची पद्धत -

सर्वप्रथम दोन कप पाणी घ्या. एक चमचा बडीशेप घाला आणि उकळवा.

चहामध्ये थोडे मध घाला.

तुमची चहा तयार आहे.

तुम्हाला हवे असेल तर तुम्ही चवीसाठी त्यात पुदिना देखील घालू शकता.

चला, आता बडीशेपच्या चहाचे फायदे जाणून घेऊया -

बडीशेप आणि बडीशेपचा चहा दोन्ही पोटासाठी रामबाण उपाय आहेत. त्याची चहा पिल्याने गॅस आणि सूज दूर होण्यास मदत होईल. पचनसंस्था चांगली राहील.

आम्लपित्त, गॅस, अतिसार, पोटदुखीमध्ये खूप आराम मिळतो.

मासिक पाळीच्या वेळी बडीशेपची चहा पिल्याने पोटदुखीपासून आराम मिळतो.

शरीरातील रक्त शुद्ध होण्यास देखील मदत होते.

यकृत आणि मूत्रपिंड शुद्ध करण्यास मदत होते.

शरीरावर जमा झालेली अतिरिक्त चरबी कमी करण्यास मदत होते. यामुळे तुमचे वजन लवकर कमी होईल.



# तुमच्या वयानुसार आहारात पनीरचा समावेश करा

पनीरमध्ये कॅल्शियम आणि प्रथिने भरपूर प्रमाणात असतात. ते मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांसाठी खूप फायदेशीर आहे. म्हणून, प्रत्येक व्यक्तीने त्यांच्या वयानुसार त्यांच्या आहारात पनीरचा समावेश करावा. लोकांना पनीर आणि त्यापासून बनवलेले सर्व पदार्थ आवडतात. ते केवळ प्रथिने आणि कॅल्शियमची कमतरताच पूर्ण करत नाही तर शरीरात व्हिटॅमिन-डी देखील भरून काढते. ते शरीरात हिमोग्लोबिनचे उत्पादन उत्तेजित करण्यास मदत करते आणि शरीरात चांगली रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. पनीरमध्ये असलेले व्हिटॅमिन बी केवळ वाढत्या मुलांच्या विकासातच मदत करत नाही तर एकाग्रता आणि स्मरणशक्ती सुधारून मेंदूचे आरोग्य देखील सुधारते. महिलांमध्ये ऑस्टिओपोरोसिस रोखण्यासाठी पनीर उपयुक्त आहे.

६ महिन्यांपेक्षा जास्त वयाच्या मुलांसाठी

पनीर हे एक पौष्टिक बाळ अन्न आहे. गाजर प्युरी, सफरचंद प्युरी इत्यादी बाळांच्या अन्नात थोडे पनीर पेस्ट मिसळून तुम्ही ते मुलाला देऊ शकता. लक्षात ठेवा की ते मुलाला खूप कमी प्रमाणात द्यावे.

वाढत्या मुलांसाठी

वाढत्या मुलांना त्यांच्या दैनंदिन आहारात कार्बोहायड्रेट्ससह पोषक तत्वांनी समृद्ध आहाराची आवश्यकता असते. अशा परिस्थितीत, तुम्ही तुमच्या वाढत्या मुलांसाठी पनीरने भरलेले पराठे बनवू शकता. मुलांसाठी दिवसाची सुरुवात करण्यासाठी हा उच्च कार्बयुक्त नाश्ता आहे. जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही त्यांना तळलेले पनीरचे तुकडे आणि भाज्यांसह गव्हाच्या ब्रेड सँडविच बनवून खायला देऊ शकता. मुलांना पौष्टिक अन्न देण्यासाठी पनीर टिक्का आणि पनीर रोलसारखे स्टार्टर्स देखील एक उत्तम पर्याय आहेत.

प्रौढांसाठी

हृदयरोग रोखल्यानंतर, रक्तदाब कमी केल्यानंतर आणि हाडांच्या आरोग्याला चालना दिल्यानंतर, हे स्पष्ट होते की पनीर प्रत्येक प्रौढ व्यक्तीच्या आहाराचा भाग असावा. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की प्रौढांनी त्यांचे अन्न पर्याय निवडताना पनीरसोबत भरपूर भाज्यांचा समावेश करावा. कारण प्रौढांमध्ये चयापचय दर मुलांपेक्षा खूपच कमी असतो. अशा परिस्थितीत, पनीरसोबत भाज्यांचा समावेश केल्याने अन्न पचण्यास खूप सोपे होते. तुम्ही भाज्या, पुलाव, हिरव्या पालेभाज्यांच्या सॅलडमध्ये पनीर वापरू शकता.

वृद्धांसाठी

कॉटेज चीज पचण्यास खूप सोपे आहे. चांगल्या पचनासाठी मॅग्नेशियम आणि फॉस्फरस दोन्ही आवश्यक असल्याने, कॉटेज चीज हे वृद्धांसाठी सर्वोत्तम पौष्टिक अन्नांपैकी एक आहे. तथापि, या वयात आतड्यांचे आरोग्य बिघडत असल्याने ते कसे आणि किती प्रमाणात सेवन करावे याची काळजी घेतली पाहिजे. तज्ज्ञांचा असा सल्ला आहे की वृद्धांसाठी, कॉटेज चीज खूप कमी तेल आणि मसाल्यांसह हलके शिजवावे. शक्य असल्यास, कॉटेज चीजसह दही देऊ नका. लक्षात ठेवा की वृद्धांना शक्य तितके घरगुती कॉटेज चीज देणे फायदेशीर ठरते. कॉटेज चीज प्रत्येक वयोगटासाठी खूप फायदेशीर आहे. प्रत्येकाने ते नियमितपणे त्यांच्या आहारात समाविष्ट करावे.



# गुलाबपाणी डोळ्यांचा थकवा दूर करेल

जर तुम्ही लॉकडाऊन दरम्यान घरून काम करत असाल आणि यावेळी कामाचे तासही वाढले असतील तर याचा परिणाम तुमच्या एकूण आरोग्यावरच होत नाही तर तुमच्या नाजूक डोळ्यांवरही होतो. घरून काम करताना लॅपटॉपचा वापर जास्त होत आहे, त्याच वेळी आपण मोबाईलच्या संपर्कातही जास्त राहतो, ज्यामुळे डोळ्यांची जळजळ, अंधुक दृष्टी आणि खाज सुटणे यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

म्हणूनच आपण आपल्या डोळ्यांची काळजी घेणे महत्वाचे आहे आणि जेव्हा जेव्हा आपल्याला डोळ्यांवर दबाव जाणवतो तेव्हा स्क्रीनपासून दूर राहावे आणि मध्येच थंड पाण्याने डोळे धुतले पाहिजेत. डोळ्यांची जळजळ होण्याची समस्या अधिक वाढते. या वेळी तुम्ही घरी असला तरी डोळ्यांमध्ये जळजळ जाणवत असेल. म्हणून, या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी, तुम्हाला तुमच्या डोळ्यांची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे, तर गुलाबपाण्याचा वापर डोळ्यांच्या समस्यांपासून मुक्त होऊ शकतो.

गुलाबपात्राचा वापर डोळ्यांना थंडावा देतो, तसेच तुम्हाला ताजेतवाने वाटतो. जास्त वेळ काम करताना डोळ्यांना ताण येतो, म्हणून स्वतःला आराम देणे खूप महत्वाचे आहे. यासाठी कापसात गुलाब पाणी टाका आणि ते डोळ्यांवर ठेवा आणि काही वेळ डोळ्यांना आराम द्या. डोळ्यांत गुलाब पाणी टाकल्यानेही त्वरित आराम मिळतो आणि तुम्हाला ताजेतवाने वाटते. म्हणून तुमच्या डोळ्यांची काळजी घ्या आणि वेळोवेळी पापण्या झटकत राहा.



# चार पायऱ्यांमध्ये DIY नेलपॉलिश बनवा



तुम्हाला किती वेळा अशा परिस्थितीतून जावे लागले आहे जिथे तुम्हाला तुमच्या आवडीचा नेलपॉलिश सापडत नाही? हे बऱ्याचदा घडते आणि आम्ही तुम्हाला आमच्या स्वतःच्या अनुभवावरून हे सांगत आहोत. बरं, जर आम्ही तुम्हाला सांगितले की तुम्ही घरी तुमचा आवडता नेलपॉलिश रंग सहज बनवू शकता तर ते खूप छान होईल. हे आश्चर्यकारक नाही का! तर महिलांनो, आम्ही तुम्हाला एक अतिशय सोपी आणि फॅन्सी ऊक्र ची ओळख करून देणार आहोत, जी तुम्हाला खूप चांगली वाटेल. आता तुम्हाला तुमची आवडती नेलपॉलिश शोधण्यात वेळ वाया घालवण्याची गरज नाही, तुम्ही ती तुम्हाला हवी तेव्हा बनवू शकता. तुमचा आवडता शेड कसा बनवायचा हे जाणून घेण्यासाठी खाली स्क्रोल करा.

साहित्यः पारदर्शक किंवा पांढरा नेलपॉलिश

तुमचा आवडता आयशॅडो पॅलेट

कापसाचा स्वॅब (कान स्वच्छ करण्यासाठी वापरला जाणारा)

कागद फनेल

आता आपण तुमच्या आवडत्या रंगाचा नेलपॉलिश बनवण्याच्या पायऱ्यांकडे जाऊया.

पद्धतः १. रंग किंवा आयशॅडोसाठी जागा मोकळी करण्यासाठी पारदर्शक किंवा पांढरा नेलपॉलिशची बाटली थोडी रिकामी करा. ही प्रक्रिया सोपी करण्यासाठी, तुम्ही पारदर्शक किंवा पांढऱ्या नेलपॉलिशच्या बाटलीतून पारदर्शक नेलपॉलिशची बाटली खरेदी करू शकता जेणेकरून तुम्ही किती नेलपॉलिश काढली आहे ते तुम्हाला सहज दिसेल.

इअरबड वापरून, तुम्हाला ज्या आयशॅडो रंगाने नेलपॉलिश बनवायची आहे तो रंग क्रश करा. नंतर, त्याची चांगली पावडर करा जेणेकरून कोणतेही तुकडे शिल्लक राहणार नाहीत. जर तुम्हाला हलका शेड बनवायचा असेल, तर आम्ही पांढरा नेलपॉलिश वापरण्याची शिफारस करतो. पेपर फनेल वापरून, नेलपॉलिशच्या बाटलीत आयशॅडो ओता. ओतताना हातात टिश्यू पेपर ठेवा. आता तुम्ही शेवटच्या टप्प्यावर आहात. आयशॅडो जोडल्यानंतर, ते चांगले हलवा जेणेकरून ते चांगले मिसळेल. जर तुम्हाला परिपूर्ण शेड हवा असेल तर ही प्रक्रिया तुमच्या सर्व शक्तीने करा.

तुमची नेलपॉलिश तयार आहे, आता तुम्ही ती जुळणाऱ्या पोशाखासोबत घालू शकता आणि जर तुम्हाला तुमच्या पोशाखाशी जुळणारी नेलपॉलिश सापडत नसेल, तर तुम्ही ही पद्धत वापरून ती त्वरित बनवू शकता. यासाठी, तुम्हाला किमान एक पारदर्शक नेलपॉलिश तुमच्यासोबत ठेवावी लागेल. तथापि, फॅशनिस्टाकडे नेहमीच पारदर्शक नेलपॉलिश असेल!



# टोमॅटोमध्ये नैसर्गिक सौंदर्याचे रहस्य लपलेले आहे



टोमॅटो हे फक्त खाण्यासाठीच नाही तर चेहरा आणि त्वचेचे सौंदर्य वाढविण्यास देखील मदत करते. चेहरा तुमच्या शरीराचा एक महत्त्वाचा भाग आहे. टोमॅटोमध्ये असलेले व्हिटॅमिन सी, अँटी-ऑक्सिडंट्स, पोटॅशियम, लायकोपीन चेहरा सुंदर बनवते आणि रंग सुधारते. याशिवाय, ते अँटी-एजिंगच्या परिणामांवर नियंत्रण ठेवण्यास देखील उपयुक्त ठरते.

याचा वापर करून त्वचेवरील अतिरिक्त तेल काढून टाकता येते. यासाठी टोमॅटोचा लगदा त्वचेवर घासून पाच मिनिटांनी धुवा. त्वचेवर टोमॅटोचा रस लावा. त्यात असलेले लायकोपीन त्वचेचा रंग सुधारेल आणि तुम्हाला ताजेपणा देखील देईल. टोमॅटो छिद्रांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करतो. त्याचा रस चेहऱ्यावर लावा आणि घासून घ्या. ते चेहऱ्याच्या छिद्रांपर्यंत चांगले पोहोचते. रस त्वचेच्या छिद्रांमध्ये गेल्यानंतर २० मिनिटांनी धुवा. दोन चमचे टोमॅटोचा रस, दोन चमचे दही आणि एक चमचा लिंबाचा रस मिसळा आणि कापसाने त्वचेला मालिश करा. १५ मिनिटांनी चेहरा धुवा. दररोज ही पद्धत अवलंबल्याने सुरकुत्या नियंत्रित करता येतात. टोमॅटो जळलेली त्वचा आणि मृत पेशी नियंत्रित करण्यास मदत करू शकते. यासाठी त्याचा रस नियमितपणे चेहऱ्यावर लावा. जर सूर्यकिरणांमुळे चेहरा काळवंडला असेल तर टोमॅटो त्यावर चोळता येतो.

# वेलचीचे फायदे

जर तुम्ही वेलचीचे सेवन केले तर तुम्ही डोकेदुखी, थकवा आणि कर्करोग यासारख्या आजारांपासून दूर राहू शकता. काळी वेलची सेवन करणे प्रभावी ठरू शकते. काळ्या वेलचीमध्ये काही विशेष प्रकारचे पोषक तत्व, फायबर आणि तेल असते. ते अनेक प्रकारचे आजार बरे करण्यास मदत करते. दररोज काळी वेलची सेवन केल्याने आरोग्य सुधारते. चला वेलचीचे आरोग्य रहस्य जाणून घेऊया.

जर तुम्ही वेलचीचे सेवन केले तर ते विषारी पदार्थ दूर ठेवेल. आणि ते आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल. काळी वेलची श्वसनाचे आजार दूर ठेवण्यास मदत करते.

जर तुम्हाला अनेक प्रकारचे आजार टाळायचे असतील तर वेलचीचे सेवन करा, कारण ते अनेक प्रकारचे आजार बरे करण्यास मदत करते. जर तुम्ही दररोज काळी वेलचीचे सेवन केले तर ते कर्करोगासारख्या आजारांशी लढण्यास मदत करेल.

त्याचे सेवन केल्याने ते कर्करोगाच्या पेशींची वाढ रोखण्याचे काम करते. जर तुम्हाला मूत्रपिंडाशी संबंधित समस्या देखील टाळायच्या असतील तर दररोज त्याचे सेवन करून तुम्ही ही समस्या टाळू शकता.

# मुंबईत सर्वत्र खड्ड्यांची रांगोळी!

## गेल्या दोन महिन्यांमध्ये तब्बल १० हजार तक्रारींचा पाढा

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

नागरिकांचे खड्डेमुक्तमुंबईचे स्वप्न कागदावरच राहणार असल्याचे खड्ड्यांच्या वाढत्या संख्येवरून दिसत आहे. गेल्या दोन महिन्यांत पालिकेकडे खड्ड्यांच्या १० हजार तक्रारी व्हॉट्सऍप, ट्विटर, तसेच ऍपद्वारे आल्या आहेत. त्यात केवळ ऑगस्टच्या २० दिवसांतील तीन हजारांहून अधिक तक्रारींचा समावेश आहे. सर्वाधिक तक्रारी या एस वॉर्डमधील भांडुप, नाहूर, विक्रोळी तसेच मुलुंड, अंधेरी, विलेपार्ले पूर्व येथील नागरिकांनी नोंदवल्या आहेत. रस्त्यांवरून चालणे, वाहन चालवणेही अवघड झाल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईत दरवर्षी पावसाळ्यात पडणाऱ्या खड्ड्यांवरून पालिका प्रशासनाला टीकेला सामोरे जावे लागते. खड्डेमुक्त मुंबईसाठी पालिकेने रस्त्यांचे काँक्रिटीकरण दोन टप्प्यांत हाती घेतले आहे. टप्पा १ आणि २ मधील मिळून जवळपास ४९ टक्के काँक्रिटीकरण ३१ मे पूर्वी झाले आहे. त्यामुळे यंदा खड्ड्यांच्या संख्येत तसेच खड्डे भरण्याच्या खर्चात मोठी कपात होईल, असा दावा पालिकेने केला. मात्र खड्ड्यांच्या वाढत्या तक्रारी पालिकेसाठी आव्हानात्मक



आहेत.

भांडुप, विक्रोळी, कांजूरमार्ग, विलेपार्ले पूर्व, जेबी नगर, चार बंगलो, गिल्बर्ट हिल, वसोवा, विद्याविहार, घाटकोपर, मालवणी, मढ, मार्वे रोड, बोरीवली, कुलपवाडी, वजिरा नका, मुलुंड, नाहूर या भागात सर्वाधिक खड्डे आहेत. त्यामुळे तेथील नागरिक त्रासले आहेत.

बजेट वाढवावे लागणार?

यंदा खड्डे बुजवण्यासाठी पालिकेने ७९ कोटींची निविदा काढली. ही निविदा मागील वर्षीपेक्षा जवळपास ६० टक्क्यांनी कमी आहे.

मात्र, दोन महिन्यांत पडलेल्या खड्ड्यांच्या संख्येवरून पालिकेला हे बजेट पुन्हा वाढवावे लागणार की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. दुसरीकडे पालिकेने यंदा मास्टिक अस्फाल्ट वापरून खड्डे बुजवण्याचा निर्णय घेतला आहे.

खड्ड्यांमुळे भरपावसात वाहतुकीत अडथळे

१८ ऑगस्ट - वाकोला पुलावरील वाहतूक संथ

२८ जुलै - बीकेसी कनेक्टर येथे वाहतूक कासवगतीने

१६ जुलै - जोगेश्वरीच्या आय. बी. पटेल येथे वाहतूक कोंडी

१ जुलै - हब मॉलजवळील पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतूक संथ

खड्ड्यांच्या एकूण तक्रारी - १०,७७५

पॉटहोल क्विकफिक्स वरील तक्रारी - ८,४४१

व्हॉट्सऍप वरील - १,५०८

ट्विटर वरील - १११

इतर - १,९१६

ऑगस्टमधील तक्रारी - ३,३२८

सोडवलेल्या एकूण तक्रारी - ९,१९६

खड्डे बुजवणे बाकी - १,५७९

इतर प्राधिकरणांच्या हद्दीतील खड्डे - ७५२

## मुंबई गणेशोत्सव २०२५ : सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना बेस्टची वीज



**■मुंबई। प्रतिनिधीः**

दरवर्षी बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागाकडून सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मिरवणूक मार्ग, विसर्जनस्थळे या ठिकाणी मुंबई महानगरपालिकेनी दिलेल्या आदेशानुसार प्रकाश योजना केली जाते. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मागणीनुसार तात्पुरता वीजपुरवठा केला जातो. बेस्ट उपक्रमाने मुंबई शहरात विद्युत रोषणाईसाठी गणेशोत्सव मंडळांना तात्पुरता वीजपुरवठा मिळावा यासाठी नियम व अटींबाबतचे प्रसिद्धी पत्रक बेस्ट उपक्रमाने जारी केले आहे.बेस्टच्या मार्गप्रकाश विभागाने मुंबई महानगरपालिकेच्या आदेशानुसार मिरवणूक मार्गावरील व विसर्जनस्थळांवरील प्रकाश योजनेची सुरक्षिततेच्या दृष्टिने आखणी केली आहे. बेस्ट उपक्रमाने मुंबई शहरात गणेशभक्तांसाठी ७१ मिरवणूक मार्ग, १९ विसर्जनस्थळे आणि ३९ कृत्रिम तलाव येथे २,७२३ दिवे लावण्याची तयारी केली आहे. विसर्जनस्थळांवर सुयोग्य प्रकाश व्यवस्थेकरीता एकूण १५ स्थायी विद्युत मनऱ्याची उभारणी केली आहे.

## सांताक्रुझमधील ९५०० झोपड्यांचे पुनर्वसन रखडले

**■मुंबई। प्रतिनिधीः**

सांताक्रुझ येथील संरक्षण मंत्रालयाच्या ४२ एकर जागेवरील ९५०० झोपड्यांचे पुनर्वसन मागील कित्येक वर्षांपासून रखडले आहे. केंद्र सरकारच्या मालकीच्या जागेवरील झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी ठोस धोरण नसल्याने पुनर्वसन रखडले आहे. त्यामुळे ९५०० झोपड्यांमधील ५० हजारांहून अधिक नागरिक असुविधांचा सामना करीत तेथे वास्तव्य करीत आहेत. हे पुनर्वसन मार्गी लावण्यासाठी आता शिवसेनेने (ठाकरे) केंद्र सरकारला साकडे घातले आहे. नवी दिल्ली येथे केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन याविषयावर चर्चा करण्यात आली. संरक्षण मंत्रलयाच्या जागेवरील या झोपड्यांचे पुनर्वसन मार्गी



लावण्यासाठी पावले उचलण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यासंबंधीचे निवेदनही देण्यात आले. मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहेत. राज्य सरकारच्या विविध विभागाच्या, यंत्रणांच्या मालकीच्या जागेवरील झोपड्यांचे पुनर्वसन मार्गी लागत आहे. त्यासाठी धोरण असून राज्य सरकारची जमीन असल्याने पुनर्वसन सहज मार्गी लावता येते. मात्र मुंबईत केंद्र सरकारच्या मालकीच्याही जमीन आहेत. या जमिनींवरही मागील कित्येक वर्षांपासून झोपड्या बांधल्या गेल्या आहेत. मात्र या झोपड्यांचे पुनर्वसन झोपु प्राधिकरणाला मार्गी लावता येत नाही. यासाठी केंद्र सरकारची परवानगी लागते, तर जमीन केंद्राकडून राज्य सरकारकडे हस्तांरित होणेही आवश्यक आहे. मात्र यासंबंधीचे धोरणच नसल्याने मुंबईतील केंद्र सरकारच्या मालकीच्या जागेवरील झोपड्यांचे पुनर्वसन वर्षानुवर्षे रखडले आहे. हे पुनर्वसन मार्गी लावावे यासाठी राज्य सरकारकडून प्रयत्न होत आहे, मात्र त्याला अद्याप यश आलेले नाही. त्यामुळेच केंद्र सरकारच्या मालकीच्या जागेपैकी एक असलेल्या सांताक्रुझ येथील ४२ एकर जागेवरील ९५०० झोपड्यांचे पुनर्वसन रखडले आहे. सांताक्रुझ येथील हनुमान टेकडी, गोळीबार, डवरीनगर येथील ९५०० झोपड्यांचे पुनर्वसन रखडल्याने अंदाजे ५० हजारांहून अधिक नागरिकांना असुविधांचा सामना करीत तेथे वास्तव्य करावे लागत आहे. त्यामुळे या झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन मार्गी लावण्यासाठी पावले उचलावीत, अशी मागणी करणारे निवेदन नुकतेच शिवसेनेचे (ठाकरे) खासदार अनिल देसाई, अरविंद सावंत आणि आमदार वरुण सरदेसाई यांनी राजनाथ सिंह यांना दिले.

## 'तुझ्या अंगात भूत आहे', पुजेला बोलावलं आणि ३२ वर्षीय महिलेवर मांत्रिकाने केला बलात्कार

**■मुंबई। प्रतिनिधीः**

कौटुंबिक आणि आरोग्याच्या समस्येने त्रस्त असलेली महिला एका मांत्रिकाकडे गेली. तिच्या अडचणींचा गैरफायदा घेत मांत्रिकाने तिला पुजा करायला बोलावून घेतलं आणि बलात्कार केला. तुज्या अंगात भूत आहे आणि ते बाहेर काढतो असे सांगून मांत्रिकाने तिला बोलावलं होतं. मुंबईतील सांताक्रुझ भागात ही घटना घडली आहे. सांताक्रुझ पोलिसांनी ३२ वर्षीय महिलेवर बलात्कार करणाऱ्या मांत्रिकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. अब्दुल राशिद असे मांत्रिकाचे नाव आहे.

पोलिसांनी सांगितले की, पीडित महिलेचे कुटुंब




अडचणींचा सामना करत आहे. त्याचबरोबर आरोग्याशी संबंधित समस्यांनाही ती सामोरी जात आहे. कौटुंबिक आणि प्रकृतीच्या समस्येला त्रासालेली महिला आरोपी मांत्रिकाकडे गेली होती. मांत्रिकाने तिला सांगितले की, तुज्या अंगात भूत आहे. तुज्या अंगातील भूत काढायचं असेल, तर आपल्याला पूजा करावी लागेल. ऑगस्ट महिन्याच्या सुरूवातीला मांत्रिक राशिदने महिलेला पूजा करण्यासाठी बोलावले.

पूजा करताना बलात्कार

पीडितेने पोलिसांना सांगितले की, मांत्रिक राशिदने पूजा करायला बोलावले होते. पूजेचा विधि करतानाच त्याने अत्याचार केला. सुरूवातीला मला वाटले की, हा भूत काढण्याच्या प्रक्रियेचाच भाग आहे. पण, नंतर लक्षात आलं की, पुजेशी याचा काही संबंध नाही. मांत्रिकाने पुजेच्या नावाखाली फसवणूक बलात्कार केला.

हा प्रकार घडल्यानंतर पीडिता सांताक्रुझ पोलीस ठाण्यात गेली. तिने पोलिसांना घडलेला सगळा घटनाक्रम सांगितला. पीडित महिलेच्या तक्रारीवरून मांत्रिकाविरोधात बीएनएसमधील कलम ६४,६४(२) आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. सध्या पोलीस मांत्रिकाचा शोध घेत आहेत.

## १० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांचे होणार जवळच्या शाळेत समायोजन, शिक्षण विभागाचा निर्णय



**■गोंदिया। प्रतिनिधीः**

कमी पटसंख्या असलेल्या १८५ शाळांना कुलूप लावण्याचे संकेत शासनाच्या वतीने पाच वर्षांपूर्वी देण्यात आले होते. गोंदिया जिल्हा आदिवासी व नक्षलग्रस्त असून, या जिल्ह्यातील अनेक शाळा दुर्गम भागात आहेत. या दुर्गम भागातील शाळा पटसंख्या अभावी बंद होण्याच्या मार्गावर होत्या. या शाळांना कुलूप लागण्याची भीती विद्यार्थ्यांसह पालक व शिक्षकांनाही सतावत होती. परंतु आता या शाळा बंद होणार नाहीत, या शाळांचे समायोजन नजीकच्या शाळांत करण्याचे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी एम. रंगनाथम यांनी १२ एप्रिल रोजी काढले आहे. जिल्ह्यात १० पटसंख्येच्या आत ४२ शाळा आहेत. कमी पटसंख्या जवळ- जवळच्या दोन-तीन शाळा एकत्र आणून समूह शाळा चालविण्याचा सरकारचा मानस असला तरी गोंदिया जिल्ह्यातील फक्त एकाच समूह शाळेचा प्रस्ताव शासनाला गेला आहे.

कमी पटसंख्या असलेल्या शाळाही सुरूच राहतील, असे नियोजन प्राथमिक शिक्षणाधिकारी सुधीर महामुनी यांनी केले आहे. त्यामुळे कमी पटसंख्या असलेल्या शाळांतील पालकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे. खासगी शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या शाळा कुठेही मागे राहू नयेत, यासाठी विविध उपक्रम राबविले जातात; पण मागील तीन-चार वर्षांपासून जि.प. शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

## परीक्षा दिली होती 'बीबीए'ची गुणपत्रिका 'बी. कॉम.'ची ! नागपूर विद्यापीठाचा भोंगळ कारभार

**■नागपूर। प्रतिनिधी :**

वेगवेगळ्या परीक्षांमधील अनियमिततेमुळे वादात राहणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परीक्षा विभागात बुधवारी नवाच गोंधळ दिसून आला. बीबीएचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेत बीकॉम अभ्यासक्रम नमूद करण्यात आला आहे. याशिवाय, प्रत्यक्षात परीक्षेला उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिकेत 'गैरहजर' दाखवून नापास करण्यात आल्याचे समोर आले आहे. गुणपत्रिका मिळाल्यानंतर असा प्रकार दिसून आल्याने गोंधळलेल्या विद्यार्थ्यांनी बुधवारी काँग्रेसच्या



अल्पसंख्याक समितीचे अध्यक्ष वसीम खान यांच्या नेतृत्वात परीक्षा विभागाचे अधिकारी मनीष झोडपे यांचा घेराव घातला. या प्रकारामुळे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाल्याची संतप्त भावना या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. विद्यापीठाच्या निष्काळजी कारभारामुळे त्यांच्या करिअरवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा आरोप वसीम खान यांनी केला. आम्ही परीक्षेला बसलो, तरीही गुणपत्रिकेत गैरहजर दाखवून नापास केले गेले. एवढ्या मोठ्या विद्यापीठात असा गोंधळ कसा होऊ शकतो, असा सवाल संतप्त विद्यार्थ्यांनी उपस्थित केला. हा प्रकार केवळ टायपिंग किंवा संगणकीय चूक नसून, परीक्षा विभागातील एकूणच बेफिकीर व निष्काळजी कारभाराचे द्योतक असल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे विद्यापीठाने यात तातडीने सुधारणा करून योग्य गुणपत्रिका द्यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. दरम्यान, परीक्षा विभागाचे मनीष झोडपे यांनी विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेत कुठलीही चूक नसल्याचा दावा केला आहे. नवीन शिक्षण धोरणानुसार बीबीए, बीसीए व बीकॉम हे तिन्ही अभ्यासक्रम एकाच नावाने ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे तिन्ही अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर 'बीकॉम' हेच नमूद राहणार आहे. गैरहजर दर्शविण्याचा विषयही त्यांनी स्पष्ट केला. एनईपीनुसार 'मेजर', 'मायनर' व इतर प्रकारचे विषय अभ्यासक्रमात असतात. संबंधित विद्यार्थ्यांचा मायनर विषयात बदल झाल्याची शक्यता असल्याने 'गैरहजर' दर्शविण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या संभ्रमामुळे हा गोंधळ होत आहे.

परीक्षा विभागाचे अधिकारी विद्यार्थी संभ्रमित असल्याचे सांगतात, पण हा संभ्रम कुणामुळे निर्माण झाला, हा सवाल आहे. मात्र, विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात एनईपी लागू करून दोन वर्षे झाली असताना विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थी आणि प्राध्यापकांमधील संभ्रम दूर करण्यासाठी काय प्रयत्न केले, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

## भूतानी तरुणीवरील अत्याचार प्रकरणी 2 आरोपींना न्यायालयाकडून जामीन मंजूर




**■पुणे। प्रतिनिधीः**

भूतानची रहिवासी असलेल्या तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याच्या आरोपाखाली अटक करून न्यायालयीन कोठडीत रवानगी केलेल्या दोन आरोपींचा जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश सुचेता टाकळीकर यांनी ३० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर अटी शर्तीवर मंजूर केला. अविनाश नोएल सूर्यवंशी व मुद्दसीर इस्माईल मेमन अशी जामीन मंजूर केलेल्यांची नावे आहेत. आरोपींच्या वतीने ॲड. मिलिंद पवार यांनी जामिनासाठी न्यायालयात अर्ज केला होता. पीडिता ही काही वर्षांपूर्वी शिक्षण व नोकरीच्या उद्देशाने पुण्यात आली होती. तिच्या मित्राने शंतनू कुकडे याच्याशी तिची ओळख करून दिली होती. कुकडे याने पीडितेची राहण्याची व जेवणाची सोय करून दिली. मात्र, पीडितेच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन पीडितेशी वेळोवेळी शारीरिक संबंध केले. तसेच कुकडेसह इतर आरोपींनीही पीडितेशी जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले.

याबाबत पीडितेने आरोपींविरुद्ध समर्थ पोलिस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केल्यानंतर इतर आरोपींसह अविनाश नोएल सूर्यवंशी व मुद्दसीर इस्माईल मेमन यांनाही अटक करण्यात आली. आरोपींचे वकील ॲड. पवार यांनी युक्तिवाद केला की, या गुन्ह्याशी दोन्ही आरोपींचा काहीही संबंध नाही. सह आरोपींसमवेत त्यांनाही अटक करण्यात आली आहे. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने दोघांना जामीन मंजूर केला.

## भीमा नदीला पूर; दौंड-शिरूर तालुक्यांचा संपर्क तुटला, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**■भीमा। प्रतिनिधीः**

दौंड तालुक्यातील भीमा नदीला आलेल्या पुरामुळे दौंड आणि शिरूर तालुक्यांचा संपर्क तुटला आहे. धरण क्षेत्रात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भीमा नदीच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. यामुळे हातवळण येथील कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा, नानगाव आणि कानगाव येथील पूल पाण्याखाली गेले आहेत. परिणामी, या दोन्ही तालुक्यांमधील गावांचा संपर्क पूर्णपणे खंडित झाला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून खडकवासला, डिंभे, चासकमान आणि भामा आसखेड धरण क्षेत्रात सुरू असलेल्या संततधार आणि मुसळधार पावसामुळे धरणे पूर्णपणे भरण्याच्या मार्गावर



आहेत. धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे मुळा, मुठा आणि भीमा नदीच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. परिणामी, खेड, शिरूर, हवेली आणि दौंड तालुक्यातील तब्बल १८ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

रांजणगाव सांडस बेट परिसरात मुळा, मुठा आणि भीमा नदीचा संगम होतो. या ठिकाणी वाळकी-देलवडीला जोडणारा पूल पाण्याखाली गेल्याने गेल्या दोन दिवसांपासून या भागातील नागरिकांचा संपर्क तुटला आहे. भीमा नदी दुथडी भरून वाहत असून, संगम परिसरात मुळा-मुठा नदीचे पाणी पारगावच्या बाजूकडील शेतांमधून राहू-पारगाव रस्त्यालगत पोहोचले आहे.

वडगाव रासाई, नानगाव आणि दौंड यांचा संपर्कही पुरामुळे तुटला आहे. नानगाव (ता. दौंड) येथील पूल पाण्याखाली गेला आहे. नानगाव, पिंपळगाव, हातवळण, वाळकी, रांजणगाव सांडस बेट, शितोळे वस्ती आणि राक्षेवाडी परिसरात भीमा आणि मुळा-मुठा नदीच्या पुरामुळे शेती पिके पाण्याखाली गेली आहेत.

शेतकऱ्यांना पुराची माहिती असल्याने अनेकांनी वीज पंप खोलून सुरक्षित ठिकाणी ठेवले होते. मात्र, पाण्याच्या जास्त विसगार्मुळे हे पंप पाण्यात भिजले आहेत. नदीकाठच्या ऊस, मका, कडवळ, कोबी, कांदा आदी पिकांमध्ये पाणी साचले आहे. परिसरातील अनेक गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

## अश्लील छायाचित्रे व्हायरल करण्याची धमकी




**■मुंबई। प्रतिनिधीः**

तरुणींना अश्लील छायाचित्रांच्या आधारे ब्लॅकमेल करण्याचे प्रकार वाढत आहेत. एका विकृत इसमाने परदेशात शिकत असेलल्या तरुणीला अश्लील छायाचित्रांच्या आधारे ब्लॅकमेल केले. या तरूणीवर पाळत ठेवण्यासाठी त्याने तिच्याच आईच्या नावाने स्नॅपचॅट खाते उघडले आणि तिच्यावर पाळत ठेवली होती. पीडित तरूणी सध्या ऑस्ट्रेलियामध्ये असून तिच्या आईच्या फियार्दीवरून पवई पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पीडित तरुणी २३ वर्षांची असून पवई पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहते. सध्या ती ऑस्ट्रेलियामध्ये शिक्षण घेत आहे. पवईत तिचे आई, वडील राहतात. ती २०१९ पासून स्नॅपचॅट समाजममाध्यम वापरत आहे. याच स्नॅपचॅटवर तिच्याबाबत हा धक्कादायक प्रकार घडला.

फेब्रुवारी महिन्यात पीडित मुलीला तिच्या आईच्या नावाने स्नॅपचॅटवर मैत्रीची विनंती (फ्रेंडशिर रिक्वेस्ट) आली होती. त्यावर तिच्या आईचे छायाचित्रे आणि कौटुंबिक माहिती होती. आईचेच खाते असल्याने तिने ती रिक्वेस्ट स्वीकारली. मात्र ते अकाऊंट तिच्या आईचे नव्हते. ते एका अज्ञात विकृत व्यक्तीचे होते. ही व्यक्ती तिच्या आईच्या नावाने सुरू केलेल्या खात्यावरून पीडित तरुणीवर पाळत ठेवत होता.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com